सरसेनापती हंबीरराव बाजी मोहिते शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कराड जि. सातारा व श्री. गोपाळराव महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कोरेगांव जि. सातारा या संस्थांच्या व वसतिगृहाच्या विद्युतीकरणाच्या कामांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
शासन निर्णय क्रमांक :मंजूरी- २६११/२०२५/प्र.क्र.८३/व्यशि-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १० मार्च, २०२६.

वाचा :- १. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १४/मालमत्ता/औप्रसं कराड/२०२५/४४७, दि. २२.१२.२०२५.

२. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १४/ मालमत्ता/ औप्रसं कोरेगांव/२०२५/३९२, दि. १०.११.२०२५.

३. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/ विनिमय, भाग-२, दि.१७.०४.२०१५.

प्रस्तावना-:

सरसेनापती हंबीरराव बाजी मोहिते शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कराड जि. सातारा या संस्थेची स्थापना सन १९५९ मध्ये झाली असून सद्यस्थितीत सदर संस्थेत एकूण २२ व्यवसायाच्या एकूण ६८ तुकड्या कार्यरत असून सदर संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांची प्रवेश क्षमता १४४४ आहे. सदर संस्थेमध्ये ३०० मुलांचे वसतीगृह असून वसतीगृहामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी प्रवेश घेतात. तसेच श्री. गोपाळराव महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कोरेगांव जि. सातारा या संस्थेची स्थापना सन १९९९ मध्ये झालेली असून सद्यस्थितीत संस्थेत ०७ व्यवसाय अभ्यासक्रमाच्या १४ तुकडया कार्यरत असून सदर संस्थेची एकूण प्रवेक्ष क्षमता २९६ इतकी आहे. उक्त दोन्ही औद्योगिक प्रशिक्षण संस्था व दोन्ही संस्थातील वसतिगृहातील विविध विभागातील विद्युत संचमांडणीची कामे करुन बराच कालावधी झाला असून वारंवार बंद पडत असल्याने प्रशिक्षणार्थी यांच्या प्रशिक्षणामध्ये बाधा येत आहे. त्यामुळे सदर यंत्रणा व संलग्न विद्युत कामे यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. संस्थेमधील

विद्यार्थ्यांना कालानरुप प्रशिक्षण देण्यासाठी तसेच प्रशिक्षणार्थी यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून विद्युत यंत्रणा सुस्थितीत व अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करणे या राज्यस्तरीय योजनेअंतर्गत सरसेनापती हंबीरराव बाजी मोहिते शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कराड जि. सातारा व श्री. गोपाळराव महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कोरेगांव जि. सातारा या संस्थांच्या विद्युत कामांच्या अंदाजपत्रकांस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचाराधीन आहे.

<u>शासन निर्णय :</u>

१. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी संदर्भाधिन पत्र क्र. ०१ व ०२ अन्वये सरसेनापती हंबीरराव बाजी मोहिते शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कराड जि. सातारा या संस्थेचे एकुण ०८ विद्युत कामांसाठी एकूण रु. ६६,११,२६७/- (रु. सहासष्ठ लाख अकरा हजार दोनशे सदुसष्ट फक्त) इतक्या रकमेच्या अंदापत्रकास व श्री. गोपाळराव महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कोरेगांव जि. सातारा या संस्थेचे एकूण ०९ विद्युत कामांसाठी एकूण रु. ६८,६०,७२१/- (रु. अडुसष्ठ लाख साठ हजार सातशे एकवीस फक्त) इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकांस प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केला होता.

२. सन २०२२-२३ च्या दरसुचीवर आधारित उपअभियंता, विद्युत उपविभाग, सा.बां.वि. सातारा यांनी तयार केलेल्या व कार्यकारी अभियंता, कोल्हापूर विद्युत विभाग, कोल्हापूर यांनी साक्षांकित केलेली Recapitulation Sheet प्रमाणे सरसेनापती हंबीरराव बाजी मोहिते शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कराड जि. सातारा या संस्थेचे एकूण ०८ विद्युत कामांसाठी एकूण रु. ६६,११,२६७/- (रु. सहासष्ठ लाख अकरा हजार दोनशे सदुसष्ट फक्त) इतकी रक्कम परिगणीत करण्यात आली आहे व सन २०२२-२३ च्या दरसुचीवर आधारित उपअभियंता, विद्युत उपविभाग, सा.बां.वि. सातारा यांनी तयार केलेल्या व कार्यकारी अभियंता, कोल्हापूर विद्युत विभाग, कोल्हापूर यांनी साक्षांकित केलेली Recapitulation Sheet (जोडपत्र ब) प्रमाणे श्री. गोपाळराव महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कोरेगांव जि. सातारा या संस्थेचे एकूण ०९ विद्युत कामांसाठी एकूण रु. ६८,६०,७२१/- (रु. अडुसष्ठ लाख साठ हजार सातशे एकवीस फक्त) इतकी रक्कम परिगणीत करण्यात आली आहे. सदर Recapitulation Sheet (जोडपत्र अ) सोबत जोडले असून त्यावर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक कार्यालय, पुणे यांची तांत्रिक सहमती दर्शविलेली आहे.

३. सरसेनापती हंबीरराव बाजी मोहिते शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कराड जि. सातारा या संस्थेचे एकूण ०८ विद्युत कामांसाठी एकूण रु. ६६,११,२६७/- (रु. सहासष्ठ लाख अकरा हजार दोनशे सदुसष्ट फक्त) इतक्या रकमेस अंदाजपत्रकास व श्री. गोपाळराव महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कोरेगांव जि. सातारा या संस्थेचे एकूण ०९ विद्युत कामांसाठी एकूण रु. ६८,६०,७२१/- (रु. अडुसष्ठ लाख साठ हजार सातशे एकवीस फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास खालील अटीं व शर्तीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१. काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वस्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.
२. ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.
३. प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय, क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१, दि.१०/०१/२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
४. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.बीडीजी २०१७/प्र.क्र.६०/इमा-२, दि.०७/०७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.
५. नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुनच सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.
६. सदर अंदाजपत्रक सन २०२२-२३ च्या दरसूचीवर आधारित आहे.
७. सदर कामाकरिता सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता लागणार नाही, याद्दष्टीने विशेष दक्षता घेण्यात यावी.
८. प्रस्तुत कामासाठी अर्थसंकल्पात तरतूद केल्याशिवाय विद्युत कामे हाती घेण्यात येऊ नये.
९. प्रस्तावित जागेवर वृक्षतोड होणार असल्यास स्थानिक प्राधिकरणाची पूर्व मंजूरी प्राप्त करुन घ्यावी.

४. सदर कामावरील येणारा खर्च “मागणी क्र. एच-८ (०३) जुन्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ (०३) (१) मोठी बांधकामे (कार्यक्रम) (४२५०२४०२) ५३, मोठी बांधकामे” या लेखाशिर्षाखाली उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

५. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.२०/०९/२०१९ अन्वये सुधारीत केलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-पाच, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील अ.क्र.१, परिच्छेद क्रमांक १३४ (१) अन्वये प्रशासकिय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३१०१३०८०७०१०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AMEY ANIL GAWADE

Digitally signed by AMEY ANIL GAWADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=20B5439BF6337AC786ACB2D216DFFF86804484EB90F4D3512213F2618F39657E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=11EB206D5E1B6D85776EB1F62A6FADEF79AFB18099A51B276758D0FFAA4C4F30, cn=AMEY ANIL GAWADE
Date: 2026.03.10 13:24:54 +05'30'

(अमेय गावडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर. (संचालनालयामार्फत).

२) महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर. (संचालनालयामार्फत).

३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.

४) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, पुणे (संचालनालयामार्फत).

५) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सातारा (संचालनालयामार्फत).

६) प्राचार्य, सरसेनापती हंबीरराव बाजी मोहिते शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कराड जि. सातारा (संचालनालयामार्फत).

७) प्राचार्य, श्री. गोपाळराव महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कोरेगांव जि. सातारा (संचालनालयामार्फत).

८) जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा (संचालनालयामार्फत).

९) निवडनस्ती (व्यशि-२ कार्यासन), कौ., रो., उ. व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग शासन निर्णय क्र. मंजूरी-२६११/२०२५/प्र.क्र.८३/व्याशि-२, दि.१० मार्च, २०२६ सोबतचे "जोडपत्र-अ"

RECAPITULATION SHEET

Est.No.133203 Providing Renovation to E.I., Street Light, Water Pump set, Solar Hot Water System, A.C. Units & D.G. Set for Government ITI at Koregaon Tal. Koregaon Dist. Satara.

Sr. No.	Work Description	Amount (Rs.)
1	**Sub Work No.1:** Providing Replacement of Street light fitting, Control Panel & Cable in the campus of Government ITI at Koregaon Tal. Koregaon Dist. Satara.	635132.4
2	**Sub Work No.2:** Providing Renovation to EI of Boys Hostel in the campus of Government ITI at Koregaon Tal. Koregaon Dist. Satara.	635374.95
3	**Sub Work No.3:** Providing Water Purifier & AC Unit for COPA & IT Dept. in the campus of Government ITI at Koregaon Tal. Koregaon Dist. Satara.	635050.64
4	**Sub Work No.4:** Providing Mini Solar Highmast (3 Nos.) in the campus of Government ITI at Koregaon Tal. Koregaon Dist. Satara.	559224
5	**Sub Work No.5:** Providing CCTV Surveillance System in Government ITI Campus at Koregaon Tal. Koregaon Dist. Satara.	597528
6	**Sub Work No.6:** Providing Replacement of Damaged Switchgear and LED Fixtures of Workshop No.1 in the campus of Govt. ITI Koregaon Tal. Koregaon Dist. Satara.	616741.95
7	**Sub Work No.7:** Providing 10 KWP on Grid Solar PV System for Government ITI Campus at Koregaon Tal. Koregaon Dist. Satara.	635475.75
8	**Sub Work No.8:** Providing Solar Hot Water System on Boys Hostel Building of Government ITI Campus at Koregaon Tal. Koregaon Dist. Satara.	237384
9	**Sub Work No.9:** Providing Diesel Generating Set with AMF Panel to Government ITI at Koregaon Tal. Koregaon Dist. Satara.	1218926.9
	Total	5770838.59
	Contingency	43332
	GST (18%)	1046550.[illegible]
	Grand Total	6860721.[illegible]
	Say Total	6860721

AMEY ANIL GAWADE

Digitally signed by AMEY ANIL GAWADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=20B5439BF6337AC786ACB2D216DFFF86804484EB90F4D3512213F2618F39657E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=11EB206D5E1B6D85776EB1F62A6FADEF79AFB18099A51B276758D0FFAA4C4F30, cn=AMEY ANIL GAWADE
Date: 2026.03.10 13:25:13 +05'30'

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग शासन निर्णय क्र. मंजूरी-२६११/२०२५/प्र.क्र.८३/व्याशि-२,
दि.१० मार्च, २०२६ सोबतचे "जोडपत्र-ब"

RECAPITULATION SHEET

Est.No.132201 Providing Renovation to E.I. Street Light, Water Pump set, Solar Hot Water System, A.C. Units & D.G. Set for Government ITI at Karad Tal. Karad Dist. Satara.

Sr. No.	Work Description	Amount (Rs.)
1	**Sub Work No.1:** Providing CCTV Surveillance System for Government ITI at Karad Tal. Karad Dist. Satara.	504555.41
2	**Sub Work No.2:** Providing Replacement of EI, LED Fixtures, Switchgears & Supply Cable for Workshop No.2 of the campus of Government ITI at Karad Tal. Karad Dist. Satara.	492982.35
3	**Sub Work No.3:** Providing Deisel Generating Set with AMF Panel for Government ITI at Karad Tal. Karad Dist. Satara.	1218926.9
4	**Sub Work No.4:** Providing Mini Solar Highmast (3 Nos.) in the campus of Government ITI at Karad Tal. Karad Dist. Satara.	626949
5	**Sub Work No.5:** Providing Replacement of EI, LED Fixtures, Switchgears & Supply Cable for Workshop No.1 in the campus of Government ITI at Karad Tal. Karad Dist. Satara.	492982.35
6	**Sub Work No.6:** Providing Renovation to E.I. & Street Light at Boys Hostel of Government ITI at Karad Tal. Karad Dist. Satara.	1288829.1
7	**Sub Work No.7:** Providing Solar Hot Water System on Boys Hostel Building of Government ITI at Karad Tal. Karad Dist. Satara.	237384
8	**Sub Work No.8:** Providing Replacement of Split Type Air Conditioning Units of Computer Lab & Conference Hall & New Projector to Conference Hall of Government ITI at Karad Tal. Karad Dist. Satara.	605679.22
	Total	5468288.33
	Contingency	134480
	GST (18%)	1008498.30
	Grand Total	6611266.63
	Say Total	6611267

AMEY ANIL GAWADE

Digitally signed by AMEY ANIL GAWADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=20B5439BF6337AC786ACB2D216DFFF86804484EB90F4D3512213F2618F39657E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=11EB206D5E1B6D85776EB1F62A6FADEF79AFB18099A51B276758D0FFAA4C4F30, cn=AMEY ANIL GAWADE
Date: 2026.03.10 13:25:25 +05'30'